# मे. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अहमदनगर यांच्या न्यायालयात.
## (श्रीमती.पी.एस.भोसले - न्यायाधीश यांच्या समोर)

**लवाद दावा क्र. १७४/२०१७**

अहमदनगर शहर सहकारी बँक मर्यादित, अ.नगर = वादी

***विरुध्द***

डॉ.उज्वला रविंद्र कवडे आणि इतर. = प्रतिवादी

*वादी तर्फे वकील श्री.के.एम.देशपांडे.*
*नियोजित प्रतिवादी क्र. ७ व ८ तर्फे वकील श्री.देवेंद्र बंब.*

**<u>निशाणी-१३९ वरील आदेश</u>**

१) वादी यांनी सदरचा अर्ज नियोजित प्रतिवादी क्र. ७ व ८ यांना दाव्यात प्रतिवादीपणात सामील करणेकामी व दाव्यात मजकुर सामील करणेकामी दाखल केला आहे.

२) वादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असुन, पुढे असे नमुद केले आहे की, वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादीं विरुध्द रक्कम रु.७,९१,०१,८५१/- रुपये वसुलीसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी वादी बॅकेकडे कर्ज अर्ज देवुन त्यांस मशिनरी विकत घेण्यासाठी कर्जाची आवश्यकता असल्याने रक्कमेची मागणी केली, त्या प्रमाणे वादी बँकेने रक्कम रु.५,७५,००,०००/- इतके कर्ज मंजुर करुन अदा केले, सदर कर्जास प्रतिवादी क्र.२ ते ६ यांनी जामिनदार राहण्याचे मान्य कबूल करुन प्रतिवादींनी वादी बँकेच्या हक्कात कर्जाचे कागदपत्र करुन दिले व संयुक्तिक व वैयक्तिक जबाबदारी स्विकारण्याचे कबूल केले आहे.

३) वादी यांनी पुढे असे नमुद केले आहे की, सदरचा दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत दाखल केली आहे. सदरचा दावा वादी यांनी सन २०१७ मध्ये दाखल केला आहे. सदर दाव्याची व वादीने दाखल केलेल्या मनाई हुकुम अर्जाची प्रतिवादी यांना माहिती आहे. वादी यांचे पुढे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र.६ व त्यांची पत्नी अनिता दर्शन सोनी यांनी वादी बँकेकडून वादी बँकेच्या शक्कर चौक शाखेकडून फ्लॅट खरेदीसाठी रु.१,४०,००,०००/- चे कर्ज घेतले होते. कर्ज घेतलेल्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

**<u>मिळकतीचे वर्णन</u>**

डी पुणे, सबडी, तालुका हवेली पैकी विमान नगर, लोहगांव येथील पुणे महानगर पालिका हददीतील मिळकतीचा सर्व्हे नं.२११ हिस्सा नं.३/२ क्षेत्र १२१०० चौ.मी. यावर बांधलेल्या लुंकड स्काय व्ही या प्रोजेक्ट मधील इमारत क्र.अे-३ मधील सहाव्या मजल्यावरील युनीट नं.६०२ चे क्षेत्र ११८.६१ चौ.मी. कारपेट एरिया २ कार वाहन तळ, क्षेत्र २० चौ.मी. ही संपूर्ण मिळकत यांसी चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस - म्यु.रोड. व सर्व्हे.नं.२०४ व २०५

दक्षिणेस - सर्व्हे.नं.२११ हिस्सा नं.१+२/इ

पश्चिमेस - सर्व्हे.नं.२११ हिस्सा नं.१+२/डी

उत्तरेस - सर्व्हे.नं.२११ हिस्सा नं.१+२/सी.

४) वर नमुद फ्लॅट प्रतिवादी नं.६ व त्यांची पत्नी यांनी प्रतिवादी नं.२ निलेश विश्वास शेळके यांचेकडून खरेदी केला असुन, प्रतिवादी नं.६ व त्यांची पत्नी यांनी सदर कर्जाचे रक्कमेची परतफेड केलेली आहे. वादी यांनी पुढे असे नमुद केले आहे की, प्रतिवादी नं.६ यांनी रिकन्व्हेन्स डीड करणेकरिता वादी बँकेकडे अर्ज केला होता. तसेच प्रतिवादी नं.६ हे वरील परिशिष्टामध्ये नमुद केलेली मिळकत हस्तांतरण करण्याच्या प्रयत्नात आहे असे वादी यांचे म्हणणे आहे.

५) वादी यांनी असे नमुद केले आहे की, प्रतिवादी नं.६ यांनी सदरच्या कर्ज प्रकरणासंबंधी निल दाखला मिळणेकामी अर्ज दाखल केला होता. परंतु वादी बँकेने प्रतिवादी नं.६ व त्यांची पत्नी यांच्या लाभात रिकन्व्हेन्स डिड करुन दिले नाही. प्रतिवादी नं.६ ह्यांना वादी बँकेचे देणे लागु नये म्हणून ते मिळकत हस्तांतरण करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे वादी बँकने निशाणी क्र.१३२ वर मनाई हुकुमासाठी अर्ज दाखल केला आहे. ही बाब प्रतिवादी नं.६ यांस दि.१२/०५/२०२१ रोजी माहिती झाली.

६) प्रतिवादी नं.६ यांनी दि.१७/०५/२०२१ रोजी वर नमुद मिळकत बक्षीस पत्राव्दारे त्यांची पत्नी अनिता दर्शन सोनी यांच्या नावे हस्तांतरीत केली. प्रतिवादी नं.६ यांनी वादीने मनाई हुकुमाचा अर्ज दाखल केल्यानंतर वर नमुद परिशिष्टामधील मिळकत त्यांचे

पत्नीचे नावे हस्तांतरण केली आहे.

७) त्याचप्रमाणे प्रतिवादी नं.६ यांनी खालील मिळकत-

दि अहमदनगर सब डी अहमदनगर पैकी मौजे कॅम्प नगर येथील महानगर पालिका हददीतील मिळकतीचा जी.एल.आर.सर्व्हे.नं.४० बंगलो नं.१३ चे क्षेत्र ३.१३ एकर यांचे १२६६६.७० चौ.मी. यावर बांधकाम ३७३.०० चौ.मी. या पैकी क्षेत्र ६३३३.३५ चौ.मी. व बांधकाम क्षेत्र १८६.५० चौ.मी. यापैकी क्षेत्र ११८७.५० चौ.मी. व बांधकाम क्षेत्र ३४.९७ चौ.मी. यासी चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस - औरंगाबाद रस्ता, हॅरीस रोड, व जी.एल.आर.नं.४४

दक्षिणेस - जी.एल.आर.नं.४१ व ४४ बाजार

पश्चिमेस - जी.एल.आर.नं.३८ व ४१

उत्तरेस - जी.एल.आर.नं.३९ व नेपीअर रोड

८) सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी नं. ६ यांचा १/३ अवभक्त हिस्सा आहे. सदरची मिळकत प्रतिवादी नं.६ यांनी त्यांचा मुलगा विवेक दर्शन सोनी यांचे नावे बक्षिस पत्राने हस्तांतरण केलेली आहे.

९) त्यामुळे वादीने प्रतिवादी नं.६ यांची पत्नी व मुलगा यांस दाव्यास आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणेबाबत व दाव्यामध्ये परिच्छेद क्र.१२ नंतर परिच्छेद १२ अे म्हणून सदर अर्जातील परिच्छेद क्र.७ नमुद करण्याची तसेच परिच्छेद क्र.१६ नंतर सदर अर्जातील परिच्छेद क्र.८ नमुद करण्याची तसेच दाव्यातील परिच्छेद क्र.१९ व परिच्छेद क्र.१९ सी नंतर १९ सी/१ म्हणून सदर अर्जातील परिच्छेद क्र.९ नमुद करण्याची विनंती केली असुन प्रतिवादी नं.६ नंतर प्रतिवादी नं.७ व ८ यांस :-

प्रतिवादी क्र.७ सौ.अनिता दर्शन सोनी,

वय-५२, व्यवसाय - धंदा

प्रतिवादी क्र.८ विवेक दर्शन सोनी,

वय-२०, व्यवसाय - शिक्षण

दोघे रा. अनुरोन ग्रॅण्ड, फ्लॅट नं. ए-३,

बुरुडगांव रोड, आनंदऋषीजी मार्ग, अहमदनगर.

यांस प्रतिवादी पणात सामील करणे कामी व अर्जात नमुद प्रमाणे दाव्यात मजकुर सामील करणेकामी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

१०) सदरच्या अर्जावर नियोजित प्रतिवादी क्र.७ व ८ यांचे म्हणणे मागविण्यात आले. नियोजित प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी निशाणी क्र.१५२ वर म्हणणे दाखल करुन असे कथन केले की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ अन्वये ज्याच्या विरुध्द कारवाई करावयाची आहे ते संस्थेचे कायदेशिर सभासद असणे आवश्यक आहे. प्रस्तुतचे नियोजित प्रतिवादी हे वादी बँकेचे सभासद नाहीत. त्यामुळे नियोजित प्रतिवादी यांना दाव्यामध्ये प्रतिवादीपणात सामिल करुन घेता येणार नाही.

११) सदरचा अर्ज वादी यांनी मुदतीत दाखल केला नाही. वादी यांनी दावा दुरुस्तीची केलेली मागणी ही कायदेशिर नाही. नियोजित प्रतिवादी क्र.७ व ८ हे दाव्यातील व्यवहाराशी कुठल्याही प्रकारे संबंधीत नाही. ते मुळ कर्जदार अथवा जामीनदार नाहीत त्यामुळे त्यांचे विरुध्द कोणतीही मागणी मागण्याचा हक्क वादी यांना नाही. तसेच प्रतिवादींनी दाव्यामध्ये परिच्छेद क्र.१२-ए व परिच्छेद क्र.१९सी-१ मध्ये नवीन परिच्छेद सामाविष्ट करण्याकामी व प्रतिवादी क्र.७ व ८ यांना प्रतिवादी पणात सामील करणेकामी दिलेला अर्ज नियोजित प्रतिवादीस मान्य नाही.

१२) नियोजित प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी पुढे असे नमुद केले की, मुळ कर्जदार यांनी वादी बँकेकडून कोटयावधी रुपयांचे मशिनरी लोन घेतले होते. सदर कर्ज मंजुर करताना वादी बँकेने खरेदी करणार असलेली मिळकत ही वादी बँकेच्या हक्कात तारण म्हणून व प्रायमरी सिक्युरीटी म्हणून घेण्याचे ठरले होते. मंजुर झालेली कर्ज रक्कम ही कोटेशन देणा-या व्यापा-याच्या खाती जमा झालेली आहे. व्यापा-यांकडून कोणत्याही प्रकारची मशिनरी मुळ कर्जदार यांना मिळालेली नाही. वादी बँकेने व मुळ कर्जदाराने एक मिलापी होऊन बँकेची व जामीनदारांची फसवणूक केलेली आहे. जामीनदार यांची कोलॅटरल सिक्युरीटी जप्त करुन मागण्याचा वादी बँकेस कोणताही अधिकार नाही. तसेच वादी यांना प्रतिवादी अथवा मुळ जामीनदारां विरुध्द कोणतीही दाद मागण्याचा अधिकार नाही. तसेच नियोजित प्रतिवादी क्र.७ व ८ प्रतिवादीपणात सामिल करता येणार नाही. सबब वादी यांचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

१३) सदरच्या अर्जावर वादी यांचे वकील व नियोजित प्रतिवादी क्र.७ व ८ यांचे वकील यांचा युक्तिवाद ऐकला .

१४) अभिलेखाचे वर्णन करता असे दिसुन येते की, वादी संस्थेने निशाणी क्र.१३२ वर प्रतिवादी क्र.६ यांच्या सदर अर्जात नमुद मिळकती अव्वल जप्तीने जप्त करणेकामी व मनाई हुकुमाकामी प्रतिवादीं अर्ज दाखल केला आहे. सदरचा अर्ज सुनावणी कामी प्रलंबित असताना वादी यांनी निशाणी क्र.१३९ वर सदरचा अर्ज दाखल करुन सदर अर्जात नमुद केलेल्या मिळकती प्रतिवादी क्र.६ यांनी दावा व मनाई हुकुमाच्या अर्जाचे कामकाज प्रलंबित असताना बक्षीसपत्राव्दारे अनिता दर्शन सोनी व विवेक दर्शन सोनी यांस बक्षिसपत्राव्दारे हस्तांतरीत केल्या असल्यामुळे प्रतिवादी क्र.६ नंतर प्रतिवादी क्र.७ व ८ यांस प्रतिवादीपणात सामिल करणेकामी तसेच सदर दाव्यातील परिच्छेद क्र.१२, नंतर परिच्छेद क्र.१२-अे म्हणुन सदर अर्जातील परिच्छेद क्र. ७ तसेच परिच्छेद क्र.१६ नंतर अर्जातील परिच्छेद क्र. ८ व १९ व परिच्छेद क्र.१९-सी नंतर परिच्छेद क्र. १९-सी (१) म्हणून सदर अर्जातील परिच्छेद क्र.९ हा मजकुर नमुद करणेकामी दाखल केलेला असल्याचे दिसुन येते. वादी बँकेने सदर मिळकतींचे दस्त निशाणी क्र.१४१ च्या वर्णन यादीसोबत दाखल केले आहे. सदर दस्तांवरुन प्रतिवादी क्र.६ यांनी सदरचा दावा हा मनाई हुकुमाच्या अर्जाच्या सुनावणी कामी असताना वर नमुद मिळकती बक्षिस पत्राव्दारे हस्तांतरीत केल्याचे दिसुन येते.

१५) सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी विरुध्द रक्कम रु.७,९१,०१,८५१/- इतक्या रक्कमेच्या वसुलीसाठी दाखल केला असुन प्रतिवादी क्र.२ ते ६ हे जामीनदार असल्याचे दिसुन येते. प्रतिवादी क्र.६ यांनी वर परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकती बक्षिसपत्राव्दारे त्यांची पत्नी नामे अनिता दर्शन सोनी व मुलगा विवेक दर्शन सोनी यांस हस्तांतरीत केल्या आहेत. दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेकामी नियोजित प्रतिवादी क्र.७ व ८ या दाव्यात आवश्यक पक्षकार करणे उचित राहील. तसेच वादी यांनी दाव्यामध्ये परिच्छेद क्र. १२,१६ व १९ मध्ये मागीतलेली दुरुस्ती ही योग्य असल्याने परिच्छेद क्र.१२, १६ व १९ मध्ये अर्जातील परिच्छेद नमुद करण्याची परवानगी वादी यांना देण्यात येत आहे. सबब खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## **आदेश**

१) वादीचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्र.६ नंतर प्रतिवादी क्र.७ अनिता दर्शन सोनी, वय-५२, व्यवसाय-धंदा, प्रतिवादी क्र.८ विवेक दर्शन सोनी, वय-२०, व्यवसाय-शिक्षण दोघे रा. अनुरोन ग्रॅण्ड, फ्लॅट नं. ए-३, बुरुडगांव रोड, आनंदऋषीजी मार्ग, अहमदनगर यांस वादी यांनी प्रतिवादीपणात सामिल करुन घ्यावे.

३) वादी यांनी अर्जात नमुद केलेली दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत विहित वेळेत दाखल करावी.

४) खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : अहमदनगर
दिनांक : २५/०४/२०२२

( श्रीमती पी.एस.भोसले )
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, अहमदनगर.